# संगीतकार श्रीनिवास खळे यांच्या संगीतातील अभिजातता– एक अभ्यास

**सौ. श्रुती मंदार कुलकर्णी,** संशोधक विद्यार्थी, संगीत व नाट्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

शब्दप्रधान गायकीचा म्हणजेच सुगम संगीताचा किंवा भावसंगीताचा प्रारंभ हा १९ व्या शतकाच्या अखेरीस झाला असला तरी खऱ्या अर्थाने १९५० नंतरचा काळ हा सुगम संगीताच्या बहराचा काळ मानावा लागतो. ह्या काळातील नव–नवे कवी ज्यांच्या रचना गेय तर होत्याच पण नुकत्याच स्वातंत्र्य प्राप्त केलेल्या तरूण वर्गाला भावनिक आवाहन करणाऱ्या, जुन्या संस्कारांच्या बेड्या मोडणाऱ्या काहीशा मुक्त विचारांना चालना देणाऱ्या होत्या. तसेच या काळातील गायक कलाकारही नविन, उमेदीचे ताजे तवाने आवाज असणारे आणि नवनवीन प्रयोगांना सामोरे जाणारे असे तयारीचे होते.

संगीतकारांचा विचार करता, 'वाटवे' युगानंतर सुधीर फडके, यशवंत देव, श्रीनिवास खळे, पं. हृदयनाथ मंगेशकर या संगीतकारांनी साहित्य आणि संगीत यांच्यातील सह अस्तित्वाचा आगळा प्रयोग मराठी भावगीत या प्रकारात यशस्वी केला.

या सर्व समकालीन संगीतकारांमध्ये 'श्रीनिवास खळे' यांनी शब्दप्रधान संगीताची बलस्थाने ओळखून, राग संगीताचा भक्कम आधार घेवून, आधुनिक वाद्यवृंदाच्या सहाय्याने निर्मिलेल्या गीतांनी रसिकांसमोर जुन्या–नव्या संगीताचा अप्रतिम मिलाफ सादर केला. विस्ताराने मर्यादित असलेली, कमाल ७/९ मिनिटांपेक्षा जास्त नसलेली श्रीनिवास खळे यांची गीते अभिजात राग संगीतातील प्रमुख वैशिष्ट्ये प्रकट करणारी आहेत म्हणजेच ती बिंदू मधे सिंधूंचे दर्शन घडविणारी आहेत असे म्हणणेच उचित होईल. गीताचे शब्द, भावतरलता, हळुवारपणा यांचे योग्य भान ठेवून त्यांनी भावसंगीताला अभिजाततेचा उच्च दर्जा प्राप्त करून दिला.

**प्रस्तावना**

संगीत ही मानवाची एक नैसर्गिक प्रवृत्ती आहे. नैसर्गिकरीत्या लोकमानसातून स्त्रवलेलं संगीत जेव्हा जाणिवपूर्वक सौंदर्याकार घेण्याच्या प्रक्रियेतून गेले तेव्हा संगीत एक 'कला' म्हणून सिद्ध झाले. ६४ कलांमधील सर्वश्रेष्ठ कला म्हणून संबोधले जाणारे संगीत हे एक ज्ञानाधिष्ठित असे अस्तित्व आहे. संगीत हे एक शास्त्र असल्यामुळे, संगीत ही विद्याही आहे आणि ती कलाही आहे.

मानवी भावभावनांच्या आंतरिक उर्मीतून संगीताचा उत्कट आविष्कार होत असतो. संगीत ही कला प्राचीन आहे तसेच शास्त्रीय संगीतात अनेक प्रयोग होवूनही ती विशुद्ध स्वरूपात अस्तित्वात आहे म्हणून संगीत ही अभिजात कला मानली जाते. तिच्यातून मिळणारा आनंद उच्चकोटीचा असतो. त्या आनंदाला ईश्वराचेच रूप मानले जाते. भारतीय संगीत ही अशी कला आहे, जिथे 'कैवल्य' म्हणजे काय याचा साक्षात्कार होत असतो. त्या आनंदाला रूप नाही, रंग नाही, निराकार, निर्गुण हे जसे ईश्वराचे वर्णन तसे भारतीय संगीताचे वर्णन करता येईल.

आज 'संगीत' हा मानवी संस्कृतीचा मानदंड ठरला आहे. प्रत्येक कलेला शास्त्राची पार्श्वभूमी असतेच. संगीताच्या बाबतीत शास्त्र आणि कला या दोन गोष्टी समांतर चालणाऱ्या आहेत. यातूनच पुढे शास्त्र आणि कला यांची विभागणी स्पष्ट झाली आणि शास्त्रीय संगीताचा आधार घेतच सुगम संगीताची नवनिर्मिती झाली. शास्त्रीय संगीतातून उगम पावलेली परंतु पूर्णत: शास्त्रीय संगीताकडे न झुकणारी, अशी शब्दप्रधान गायकी म्हणजे 'सुगम संगीत'. काव्य आणि संगीत यांच्या अर्थपूर्ण संतुलनातून ही शब्दनिष्ठ गायकी किंवा संगीत प्रकार उदयास आला जो लोकप्रियही झाला आणि पुढे अनेक प्रतिभावंतांनी आपल्या रचनांनी हे सुगम संगीताचे दालन समृद्ध केले.

एकोणीसाव्या शतकाच्या अखेरीस सुरांच्या साथीने कविता म्हणण्यातून भावसंगीताची सुरवात झाली असली तरी पुढे जाऊन दशरथ पुजारी, वसंत प्रभू, सुधीर फडके, श्रीनिवास खळे, यशवंत देव, पं. हृदयनाथ मंगेशकर या संगीतकारांनी आपल्या कल्पक तालविचार, रागविचार, वाद्यांचा सूचक वापर आणि सौंदर्य विचाराने

आधुनिक भावसंगीत समृद्ध केले, लोकप्रिय केले असे विशेष जाणवते.

या सर्व समकालीन संगीतकारांमध्ये श्रीनिवास खळे यांनी आपला वेगळा ठसा उमटवलेला दिसतो. स्वत:शीच स्पर्धा असल्या प्रमाणे त्यांनी उत्तमोत्तम गीते निर्मिली. आपल्या रचनांमध्ये त्यांनी अभिजात शास्त्रीय संगीतातील मींड, गमक, हरकती, मुर्की, मूर्च्छना, आविर्भाव-तिरोभाव इ. अलंकारांचा उपयोग केल्याचे दिसते. त्यामुळे गीतातील शब्दांच्या अर्थाबरोबर भाव ही श्रोत्यांपर्यंत पोचवणे सुलभ झाले असे प्रत्ययास येते.

श्रीनिवास खळे यांनी आपल्या पूर्वसुरींनी घालून घेतलेली कुंपणे मोडून काढली आणि भावसंगीतात नवा ताजेपणा आणला. खळेंच्या गीतांमध्ये दृगोचर होणारी अभिजात संगीताची मूलतत्त्वे प्राचीन स्वरूपात सुगम नव्हती मात्र त्यांचा लालीत्यपूर्ण आणि कलात्मक आविष्कार त्यांनी अभिजाततेच्या उंचीवर पोहोचला आहे असे दिसून येते.

**विषय विवेचन**

अभिजात संगीताला त्याची अभिजातता ज्या तत्वातून मिळते, ती तत्वे सुगम नसतात, मात्र ती सुगम वाटणाऱ्या ललित संगीतामध्ये सहजतेने उमटू शकतात हे श्रीनिवास खळे यांच्या रचना आपल्याला सांगतात. श्रीनिवास खळे यांच्या संगीतातील अभिजात मूल्ये स्पष्ट करताना प्रथम अभिजातता म्हणजे काय? हे जाणून घेणे आवश्यक आहे.

अभिजात शब्दाचा अर्थ- उच्चकुलीन, खानदानी, शुद्ध असा आहे. 'अभिजातता' म्हणजेच Classicism ही मूळ पाश्चिमात्य कल्पना आहे. हेडन, मोझार्ट, बेथोवेन या पाश्चात्य संगीतकारांचा काळ (१७५०-१८१०) व त्यांनी निर्मिलेले संगीत हे अभिजात मानले जाते.

भारतातील इतर प्राचीन कलांप्रमाणे भारतीय शास्त्रीय संगीतासाठी 'अभिजात' ही पाश्चात्य संकल्पना वापरली जाते. कोणत्याही कलेची अथवा कलाकृतीची अभिजातता सिद्ध करण्यासाठी निर्मिलेले निकष व श्रीनिवास खळे यांच्या स्वररचनांमधून त्यांची झालेली पूर्तता पुढीलप्रमाणे सांगता येईल-

**१) कला प्राचीन असली पाहीजे व त्यामध्ये नवनिर्मिती होत असताना त्याची प्राचीन वैशिष्ट्ये कायम राहिली पाहिजे.**

श्रीनिवास खळे यांच्या संगीतात प्राचीन व अभिजात अशा शास्त्रीय संगीताचा मुबलक उपयोग करून सर्व प्रकारच्या रचना त्यांनी स्वरबद्ध केल्या आहेत. त्यामुळे श्रीनिवास खळे यांच्या नवनिर्मित रचनांमध्ये प्राचीन अभिजात संगीतातील अभिजातता संक्रमित झालेली दिसून येते. उदा- *'धरीला वृथा छंद'* (मालकंस), *'उगवला चंद्र पुनवेचा'* (संपूर्ण मालकंस), *'वेगवेगळी फुले उमलली'* (चारूकेशी), *'काल पाहिले मी स्वप्न गडे'* (गौडसारंग) अशी गीते प्राचीन व अभिजात शास्त्रीय संगीताचा मुबलक उपयोग करून श्रीनिवास खळे यांनी स्वरबद्ध केलेल्या रचना म्हणून उदाहरणादाखल देता येतील.

**२) कलेची मौलिकता व सलगता दिसून यावी. कलेने मानवी जीवन व मन समृद्ध करणेसाठी मौलिक सहयोग केला असला पाहिजे. कलेची मौलिकता मानवी जीवनाशी, संस्कृतीशी संबंधित असली पाहिजे.**

श्रीनिवास खळे यांनी पारंपारिक आणि नवतेचा संगम साधताना अनेक प्राचीन अभंगरचना संगीतबद्ध केल्या आहेत. उदा- १) 'अभंग तुकयाचे' (१९७३) संत तुकाराम महाराजांच्या अभंगांची ध्वनिमुद्रिका २) 'अभंगवाणी' (१९८०) संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ यांचे अभंग.

या सर्व रचना अभंग म्हणून अभिजात आहेतच त्याचबरोबर त्या मानवी मनाला उन्नत करणाऱ्या, कैवल्याचा अनुभव देणाऱ्या अशाच आहेत.

**३) प्राचीन कला व तिचे आधुनिक रूप यांची सांगड दिसली पाहिजे.**

श्रीनिवास खळे यांच्या रचना अभिजात शास्त्रीय संगीतावर आधारित असल्याने त्यांची आधुनिक सुगम संगीताशी सांगड खळेंच्या संगीतात स्पष्ट दिसते. यामध्ये अभिजाततेचा प्रवाह अखंडपणे दिसून येतो. उदा- 'राम

शाम गुणगान' (१९८५) ही कृष्णभक्ति व रामभक्ति वर आधारित आठ गीतांची ध्वनिमुद्रिका श्रीनिवास खळे यांची शाश्वत निर्मिती म्हणून ओळखली जाते.

**४) काळाच्या कसोटीला उतरून अक्षर ठरलेले, शाश्वत जीवनतत्वे, या गुणांनी संपन्न अशी निर्मिती जी आदर्श व अनुकरणीय असेल.**

श्रीनिवास खळे यांच्या रचना काळाच्या कसोटीवर अक्षर गीतांचा प्रत्यय देणाऱ्या आहेत. गेल्या १०० वर्षांमध्ये निर्माण झालेली भावगीते किंवा सुगम संगीताच्या रचनेत ती सर्वोत्तम तर आहेतच परंतु सर्वकाल सर्वोत्तम मानावीत अशी आहेत. उदा. *'शुक्रतारा मंदवारा'*(१९६३), *'श्रावणात घन निळा बरसला'* (१९६८), *'या चिमण्यांनो'*(१९६८).

अशा प्रकारे श्रीनिवास खळे यांच्या रचनांनी अभिजाततेचे सर्व निकष पूर्ण केले आहेत असे संशोधकास अभ्यासाअंती दिसून आले आहे. त्यांच्या अनेक संस्मरणीय अभिजात भावगीतांपैकी एक, *'धरीला वृथा छंद'* हे गीत संशोधकाने गीत संहितेसह, स्वरलेखन व सांगीतिक, साहित्यीक विश्लेषणासह प्रस्तुत केले आहे.

**धरीला वृथा छंद**

अनेक भावकाव्ये बघितली, तर आपल्या असे लक्षात येते की, ही काव्ये अधिकतर स्त्री भावविश्वाभोवती फिरणारी असतात. मात्र प्रस्तुत गीतात नायक हा एखादया नायिकेप्रमाणे भावना विवश झालेला आहे. आपल्या प्रेयसीची वाट पहात असताना ती असल्याचा नुसता भासच त्याला होत आहे आणि त्यामुळे नायकाचे मन अधिकच विषण्ण होत आहे.

प्रथम दर्शनी पहाता वरील भाव या गीतातून स्पष्ट होत असला तरी, जेव्हा एखादे काव्य आपल्या वाचनात किंवा ऐकण्यात येते तेव्हा त्या गीतामध्ये गर्भितार्थाच्या अनेकविध छटा प्रत्ययास येतात. या गीताच्या संदर्भात आपल्याला असेच म्हणता येईल. एखादे असाध्य ध्येय साध्य करण्यासाठी निष्फळ ठरलेला प्रवास, ईश्वर प्राप्ती किंवा अध्यात्मातील विशिष्ठ उंची गाठता न येणे, किंवा काव्याच्या क्षेत्रातील शिखर दृष्टी-पथात आहे पण तिथे पोहोचता येत नाही अशा परिस्थितीत अनुभवता येणारी विफलता, नैराश्य, हतबद्धता या विविध भावना जणु काही कवीला प्रस्तुत काव्यामधून अभिव्यक्त करायच्या आहेत, असे जाणवते.

**गीत संहिता**

ताल–झपताल राग मालकंसवर आधारित

*धरिला वृथा छंद*
*नव्हतेच जर फूल, कोठून मकरंद ।।धृ।।*


*जरी जीव हो श्रांत, नाही तृषा शांत*
*जलशून्य आभास, शोधीत मृग अंध ।।१।।*

*झाले तुझे भास, मी रोधिले श्वास*
*माझीच मज आस, घाली असा बंध ।।२।।*

*पथ सर्व वैराण पायी नूरे त्राण*
*माझे घर आज, झाले मला बंद ।।३।।*

ताल – झपताल

| X | | 2 | | | 0 | | 3 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | ध | री |
| | | | | | | | | म | ग |
| ला | वृ | था | ऽ | ऽ | धुंऽऽ | ऽऽऽऽ | दऽ | न | रह |
| सा | सा | ध | पम | ग | गमध | गमगसा | साग | ग | ग |
| तेऽऽ | ऽऽऽ | ऽच | ज | र | फ़ूऽ | लऽ | कोऽ | ऽऽ | ऽऽ |
| सांनीग | गसा<sup>नी</sup>ध | नीध | नी | सा | ग- | ग- | सा- | ग- | मनी |
| दूऽ | ऽऽ | न | मऽ | कऽ | रंऽ | ऽऽऽ | दऽ | | |
| नीध | नीध | म | नीध | धप | पध | मगसा | साग | | ॥ध्रु॥ |
| | | | | | | | | ज | री |
| | | | | | | | | नी | नी |
| जीऽ | ऽऽऽ | वऽ | ऽऽ | होऽ | जोऽ | ऽऽऽ | तऽऽ | ना | ही |
| नीप | <sup>प</sup>गमग | ग- | -- | पनी | गंसा | नीधनी | धपनी | ध | मं |
| तूऽ | ऽऽ | बाऽ | ऽऽ | ऽऽ | शांऽ | ऽऽ | तऽ | ज | ल |
| म- | परे | रे- | गरे | सानी | रे- | -- | रे- | नी | रे |



'पथ सर्व वैराण' या तिसऱ्या अंतऱ्याची चाल 'जरी जीव हो' या पहिल्या अंतऱ्या प्रमाणे.

संगीतकार श्रीनिवास खळे यांनी या भावोत्कट गीतासाठी 'मालकंस' रागाची योजना केली आहे. मालकंस राग करूण, आणि गंभीर भाव दर्शवितो. त्याच्या कारूण्यातही जराशी तत्वज्ञानी झलक आहे. संयत गांभीर्याने अदृष्टाचा स्वीकार व शांतपणे संघर्षाची समाप्ती हाच संदेश मालकंस राग देतो.

अथांग, शांत आणि धीरगंभीर वाटणाऱ्या मालकंस रागामधील षड्ज आणि मध्यम हे स्वर इतर सुरांवर वर्चस्व गाजवणारे आणि स्वत: कडे लक्ष वेधून घेणारे आहेत. उदासी, हताशपणा, असहाय्यता सांगणारा असा कोमल धैवत आणि सात्विक स्वभावाने इतरांना जिंकू पाहणारा कोमल निषाद हे स्वर मालकंस चे वैशिष्ट्य आहेत.

संगीतकार श्रीनिवास खळे यांच्या शैलीनुसार प्रस्तुत गीतात अनेक गुंतागुंतीचे सांगीतिक वाक्यांश आहेत. जेणेकरून रचना हळूहळू अवघड बनत जाते.

वस्तुत: ही बंदिशच आहे की काय असा प्रश्न पडावा अशी मांडणी आहे. पहिला व तिसरा अंतरा सप्तकाच्या उत्तरार्धात आणि दुसरा अंतरा तार सप्तकात घेवून शुद्ध निषादाची छटा दाखविली आहे. पहिल्या व तिसऱ्या अंतऱ्याच्या दुसऱ्या ओळीत अनुक्रमे 'जलशून्य आभास' आणि 'माझेच घर आज' मूर्च्छना पद्धतीचा अवलंब केला गेला आहे.

'मी रोधीले श्वास माझीच मज आस' या दुसऱ्या अंतऱ्यातील दुसऱ्या ओळीत गायक सुरेश वाडकर यांनी बोलउपज अंग ही दाखवले आहे. या ओळींमध्ये मालकंस रागातच श्रीनिवास खळे यांनी अतिशय कल्पकतेने संपूर्ण मालकंस रागाच्या स्वरसमुहांची योजना केलेली आहे. साथीचा तबला शास्त्रीय अंगाने वाजवला गेला आहे. मात्र तालाच्या मात्रा आणि त्यानुरूप येणाऱ्या हरकती फारच विलोभनीय आहेत.

**निष्कर्ष**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर साहित्य, संगीत, कला यामध्ये नवनिर्माणाचे वारे वाहू लागले. १९५० नंतर मराठी साहित्यात नवकथा आल्या. काव्यात वि.दा., ग्रेस, बोरकरांनी मुक्त काव्यरचना केली. नाटकांमध्ये तेंडुलकरांनी नवे प्रवाह आणले आणि शास्त्रीय संगीतात पंडित कुमार गंधर्व, पं. भीमसेन जोशी, पं. जसराज, किशोरी आमोणकर यांनी क्रांती केली. तद्वतच सुगम संगीतात श्रीनिवास खळे, पं. हृदयनाथ मंगेशकर, सुधीर फडके, यशवंत देव या संगीतकारांनी अभिरूची संपन्न श्रोतृवर्ग निर्माण करणाऱ्या रचना केल्या. या सर्वांमध्ये श्रीनिवास खळे यांच्या नावे इतिहासात सुवर्णपान लिहावे, अशी कामगिरी त्यांचेकडून झाली.

श्रीनिवास खळे यांचे समकालीन संगीतकारांनीही राग संगीताचा आधार घेवून आपली गीते सादर केली आहेत. परंतु संगीताचा अत्युच्च दर्जा, प्राचीन तसेच आधुनिक कलेचा समन्वय साधून राग-लय-ताल-स्वर यांच्या समतोल मिलाफातून निर्माण केलेल्या रचना अप्रतीम तर आहेतच परंतु 'अक्षर' दर्जा प्राप्त आहेत. या स्वर रचनांमध्ये अभिजात तत्त्वांबरोबरच, शास्त्रीय संगीतातील अलंकार व सुगम संगीतातील सौंदर्य तत्त्वे यांचाही अंतर्भाव स्पष्ट होतो.

१९२८ हा सुगम संगीताचा प्रारंभ मानला तर १९५० ते १९८० हा काळ सुगम संगीताचा सुवर्णकाळ होता असे प्रत्ययास येते. या काळात श्रीनिवास खळे यांनी निर्मिलेल्या रचना या सर्वकाळ सर्वोत्तम ठरल्या. किंबहूना खळेंच्या नंतर भावसंगीताचे भविष्य काय? अशी रास्त चिंता रसिकांच्या मनात निर्माण झाली आहे. त्यावरून श्रीनिवास खळेंचे मोठेपण त्यांची अपरिहार्यता सिद्ध होते.

**संदर्भ सूची**


१) मार्डीकर मोहना: संगीतशास्त्र परिचय, विजय प्रकाशन, तृतीय आवृत्ती, २०१४.

२) पटवर्धन सुधा: स्मरण संगीत, दिलीपराज प्रकाशन, २०१३.

३) शेंडे संजीव: मुक्त संगीत संवाद, गानवर्धन निर्मिती, १९८८.

४) देवरे सुधीर: महाराष्ट्र साहित्य पत्रिका, एप्रिल/सप्टेंबर २०१८.

५) जाधव रा. ग.: मराठी विश्वकोष खंड १, अभिजाततावाद.

६) खाडीलकर मंगला: सुमन ग्रंथ, नवचैतन्य प्रकाशन, २०१५.

७) संगोराम श्रीरंग: आस्वादक संगीत समीक्षा, राजहंस प्रकाशन, २००३.

८) गोविलकर अनिल: रागरंग- ख्याल ते सुगम संगीत, मैत्रेय प्रकाशन, २०१५.

९) देव यशवंत: शब्दप्रधान गायकी, पॉप्युलर प्रकाशन, २००६.

१०) रानडे प्रमोद: गोष्टी गाण्यांच्या, शैलेंद्र प्रकाशन, २०१६.